**ठळक बातम्या**

- आषाढी एकादशीनिमीत्त महाराष्ट्रात सर्वत्र भक्तिमय वातावरण /पंढरपुरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न, राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती देण्याचं विठ्ठलचरणी साकडं

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ब्रिक्स शिखर परिषदेसाठी रिओ दी जानेरोमधे दाखल

- अमेरिकेत टेक्सास राज्यात आलेल्या भीषण पुरामुळे आतापर्यंत किमान ४९ जणांचा मृत्यू

- जागतिक मुष्टीयुद्ध स्पर्धेत भारताच्या साक्षी चौधरीनं महिलांच्या ५४ किलो गटात पटकावलं सुवर्ण पदक

**आणि**

- इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा विजय दृष्टिपथात

**<><><><><>**

आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरात विविध विठ्ठल मंदिरांमध्ये भक्तांचा महासागर लोटला आहे. सर्वत्र जय हरी विठ्ठल आणि पांडुरंग हरीचा जयघोष आणि टाळ-मृदंगाच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमून गेल्याचं वातावरण आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना आषाढी एकादशीनिमित्त शुभेच्छा दिल्या. विठूमाऊली आपल्या समाजाला आनंदाची आणि समृद्धीची वाट दाखवेल, अशी भावना त्यांनी समजामाध्यमावर व्यक्त केली.

पंढरपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज पहाटे मानाच्या वारकरी दांपत्यासह यांनी सपत्निक, विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. पांडुरंगानं राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गानं चालण्याची सुबुद्धी द्यावी,

बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्यासाठी आशीर्वाद द्यावा, असं साकडं त्यांनी विठ्ठलाला घातलं. सर्व विठ्ठलभक्तांनी वारीच्या माध्यमातून पर्यावरणसंवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**- होल्ड बाईट - मुख्यमंत्री -**

शासकीय महापूजेच्या मानाच्या वारकरी दांपत्याचा सन्मान, तसंच स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा श्रीविठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कारानं सन्मानही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी झाला.

**मुंबईत** वडाळ्याच्या प्रती पंढरपूर असलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक विठुरायाची पूजा केली. यावेळी शिंदे यांनी मंदिराच्या विकास आणि सुशोभीकरणासाठी मंजूर केलेल्या २५ कोटी रुपयांच्या कामांना लवकरच सुरुवात होईल, असं सांगितलं.

**<><><><><>**

अशूरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागात पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसैन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्य आणि न्यायासाठी करबाला इथं दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून हा दिवस पाळला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यानिमित्तानं या बलिदानाचं स्मरण करून, यातून लोकांना बिकट परिस्थितीत सत्याच्या बाजूनं उभं राहण्याची प्रेरणा मिळत असल्याचं प्रतिपादन समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. अर्जेंटिनाचा यशस्वी दौरा आटोपून प्रधानमंत्री आज ब्राझीलला पोहोचले. तिथल्या भारतीय समुदायानं उत्साहात त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर ब्रिक्स परिषदेसाठी ब्राझीलची राजधानी रिओ दी जानेरो इथल्या म्यूझियम ऑफ मॉडर्न आर्ट इथं पोचले, तेव्हा ब्राझीलचे अध्यक्ष लुईज इनॅशिओ लुला दा सिल्वा यांनी त्यांचं स्वागत

केलं. ब्रिक्स शिखर परिषदेत जागतिक शासन सुधारणा, हवामान बदलाची आव्हानं, कृत्रिम बुद्धिमत्तेसह इतर अनेक विषयांवर विचारमंथन होणार आहे.

**<><><><><>**

आपण ज्ञानेश्वरांचे, शिवरायांचे, क्रांतीज्योती सावित्रीबाईंचे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थेट वंशज नसलो, तरी विचारांच्या वारश्याचे वाहक आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. त्यांनी आजपासून ‘महाराष्ट्रधर्म’ विशेष पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ केला. त्यात ते बोलत होते. या सर्वांनी आपल्या ज्ञानानं, त्यागानं आणि धैर्यानं हे राज्य घडवलं. त्याला जपणं, वाढवणं, आणि पुढं नेणं हे आपलं कर्तव्य आहे, असं ते म्हणाले.

‘महाराष्ट्रधर्म ही एक जीवंत मूल्य संहिता आहे, ती सांगते, विवेकाने विचार करा, सेवाभावानं वागा, आणि शौर्यानं उभे राहा. ज्ञानेश्वरांच्या ओव्यापासून शिवरायांच्या तलवारीपर्यंत, फुल्यांच्या साहसापासून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनापर्यंत ही साखळी कधी तुटलीच नाही. ती सतत पुढं सरकत राहीली,’ असं फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

देशाच्या आर्थिक विकासात सहकारी संस्थांचं योगदान महत्त्वपूर्ण असल्याचं केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. सहकार मंत्रालयाला चार वर्ष झाल्याबद्दल गुजरातमध्ये आणंद इथं अमूल आणि ‘एनडीडीबी’ अर्थात, राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाच्या विविध विकास कामांचं उद्घाटन करताना शाह बोलत होते. दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारिता विद्यापीठ, अन्नधान्य उत्पादन आणि विक्रीशी संबंधित तीन सहकारी संस्था आणि दुग्धव्यवसायाशी संबंधित तीन सहकारी संस्था एकत्रितपणे देशाच्या सहकारी चळवळीला अधिक बळकटी देतील असे ते म्हणाले.

डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त शाह यांनी त्यांना आदरांजली वाहिली आणि म्हणाले की, त्यांच्याशिवाय काश्मीर भारताचा अविभाज्य भाग झाला नसता.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष, आणि केंद्रीय सहकार मंत्रालयाचा स्थापना दिन हे औचित्य साधत सोलापूरात आज सहकार रॅली झाली.

**<><><><><>**

अमेरिकेत टेक्सास राज्यात आलेल्या भीषण पुरामुळे आतापर्यंत किमान ४९ जणांचा मृत्यू झाला असल्याचं वृत्त आहे. मृतांमध्ये १५ लहान मुलांचा समावेश असून, एका खासगी युवा शिबिरातून २७ मुलं बेपत्ता असल्याची माहिती तिथल्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. पुराच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ८५० लोकांना वाचवण्यात यश आलं असल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

दरम्यान, या भागात आणखी पाऊस पडून पुन्हा पूर येण्याची शक्यता तिथल्या हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

दरम्यान, नरेंद्र मोदी यांनी या भीषण पुरामुळे झालेल्या जीवितहानीबद्दल, विशेषतः लहान मुलांच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. आपल्या संवेदना अमेरिकेचं सरकार आणि दु:खग्रस्त कुटुंबियांसोबत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कजाकीस्तानमधे अस्ताना इथं सुरु असलेल्या जागतिक मुष्टीयुद्ध स्पर्धेत भारताच्या साक्षा चौधरीनं आज महिलांच्या ५४ किलो गटात सुवर्णपदक पटकावलं. अंतिम सामन्यात तिनं अमेरिकेच्या योसेलीन पेरेसवर ५-० असा निर्विवाद विजय नोंदवला.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यावर भारताची मजबूत पकड कायम आहे. आज सामन्याच्या अखेरच्या दिवशी, पावसामुळे खेळ उशीरा सुरू झाला. मात्र भारताच्या आकाशदीप यानं ओली पोप आणि हॅरी ब्रुक यांना झटपट माघारी धाडलं. त्यानंतर वॉशिंगटन सुंदर यानं उपहाराआधी बेन स्टोक याला बाद केलं. त्यामुळे इंग्लंडच्या फलंदाजीला लगाम बसला असून भारताला हा सामना जिंकून मालिकेत बरोबरी साधण्याची संधी आहे. इंग्लंडतर्फे जॅमी स्मिथनं सर्वाधिक धावा केल्या असून त्यानं अर्धशतक पूर्ण केलं आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा, इंग्लंडच्या दुसऱ्या डावात ६ बाद १८४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

नाशिक इथं आयोजित ७ व्या चाईल्ड कप तलवारबाजी स्पर्धेत मुलांच्या सेबर प्रकारात महाराष्ट्राच्या श्रीराज पोळ यानं आज सुवर्णपदक पटकावलं. अंतिम लढतीत त्यानं तामिळनाडूच्या ए. एस. जोसेफ याचा ११-८ असा पराभव केला. याच प्रकारात महाराष्ट्रच्याच अरोह जाधव आणि पंजाबच्या हेयांश गर्ग यांना संयुक्तपणे कांस्य पदक मिळालं. आजच्या पदकं प्राप्त केलेल्या खेळाडूंना या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे असलेले आशियाई तलवारबाजी असोसिएशनचे सरचिटणीस राजीव मेहता, आणि इतर मान्यवरांच्या हस्ते पदकं आणि प्रमाणपत्रं प्रदान करून सन्मानित करण्यात आले. विविध राज्यांचे ३९० खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

राजधानी दिल्लीत आज बाराशेहून अधिक नर्सिंग अधिकाऱ्यांना केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र वाटण्यात आली. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यावेळी उपस्थित होत्या. भारताच्या आरोग्य धोरणाने

रुग्णोपउपचार पद्धतीकडून आजार प्रतिबंधक उपचार पद्धतीकडे प्रवास केला आहे. असं नड्डा यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा योजनातून मिळालेल्या निधीतून दिल्ली सरकार अकराशेहून जास्त आरोग्यमंदिरं उभारेल. कॅन्सर, मधुमेह रक्तदाबासारख्या आजारांशी लढा देण्यासाठी या पायाभूत आरोग्य सुविधआ उपयोगी पडतील असंही नड्डा यांनी सांगितलं.
आयुष्मान भारत नोंदणी वाहनांना यावेळी नड्डा आणि रेखा गुप्ता यांनी हिरवा झेंडा दाखवला. ही वाहने आयुष्मान भारतसाठी नोंदणी सुविधा देण्यासाठी दिल्लीत घरोघरी जातील.

//<><><><><>//